# Possitive Stories

गडचिरोली दि. २७/०५/२०१७

## *दर्भा जंगल परीसरात पोलीस नक्षल चकमक*

नक्षली दर्भा जंगल परीसरात सभा घेणार असल्याची गोपनिय माहिती पोमके धोडराज पोस्टातील अधिकाऱ्यांना मिळाल्यानंतर त्याआधारे उपविभाग भामरागड अंतर्गत पोमके धोडराज हद्दितील मौजा दर्भा जंगल परीसरात धोडराज पोस्ट पार्टी व सिआरपीएफ संयुक्तपणे नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना काल दिनांक २६/०५/२०१७ रोजी दुपारी ०३.०० ते ०३.३० च्या दरम्यान पोलीसांनी बंदुकधारी नक्षलवाद्यांच्या दिशेने गोळीबार सुरु केला. नक्षल्यांनी त्यांच्याकडील बेकायदेशीर शस्त्रांनी पोलीसांच्या दिशेने गोळीबार केला. परंतू पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादी जंगलाचा फायदा घेवून सदर ठिकाणाहून पळून गेले.

सदर जंगल परिसरात चकमकीनंतर नक्षलविरोधी शोधमोहिम तीव्र करण्यात आली आहे.